**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या महापौरपदासाठीची आरक्षण सोडत जाहीर, मुंबईचं महापौरपद खुल्या प्रवर्गासाठी

- जिल्हा परिषद पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी अर्जांची छाननी सुरु

- तिसरी मुंबई आणि रायगड जिल्हा परिसरातल्या विविध प्रकल्पांसाठी महाराष्ट्र सरकारचे सामंजस्य करार

- पी व्ही सिंधू आणि लक्ष्य सेन इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत दाखल

**आणि**

- प्रख्यात ढोलकीवादक राजाराम जामसंडेकर यांचं निधन

**<><><><><>**

महाराष्ट्रात २९ महानगरपालिकांच्या महापौरपदासाठीची आरक्षण सोडत आज मुंबईत मंत्रालयात जाहीर झाली. त्यानुसार १७ महानगरपालिकांमधे महापौरपद अनारक्षित राहील. या १७ पैकी मुंबई, नवी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, मीरा भाईंदर, मालेगाव, नांदेड-वाघाळा आणि धुळे या ९ ठिकाणी महापौरपद खुल्या प्रवर्गातल्या महिला उमेदवारांसाठी असेल. तर छत्रपती संभाजीनगर, पिंपरी चिंचवड, सांगली-मिरज-कुपवाड, परभणी, अमरावती, सोलापूर, वसई-विरार आणि भिवंडी निजामपूर खुल्या प्रवर्गासाठी आहे.

पनवेल, इचलकरंजी, कोल्हापूर आणि उल्हासनगर महानगरपालिकेत इतर मागास वर्गियांसाठी तर जळगाव, चंद्रपूर, अहिल्यानगर आणि अकोल्यातलं महापौर पद ओबीसी प्रवर्गातल्या महिला उमेदवारासाठी राखीव झालं आहे.

ठाण्याची जागा अनुसूचित जातींसाठी राखीव असून जालना आणि लातूरमध्ये अनुसूचित जातीतल्या महिला नगरसेविकेला महापौर पदाची संधी मिळेल. कल्याण-डोंबिवली महापालिकेतलं महापौर पद अनुसूचित जमातीसाठी आरक्षित झालं आहे.

दरम्यान, आरक्षण सोडत काढण्याचे नियम कुणालाही न सांगता बदलण्यात आल्याचा दावा मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी केला आहे. मुंबईतले गेले २ महापौर सर्वसाधारण प्रवर्गातून होते त्यामुळं यंदा ओबीसी किंवा अनुसूचित जमाती प्रवर्गातल्या सदस्याला संधी मिळायला हवी होती, अशी मागणी त्यांनी केली.

<><><><><>

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदांमधल्या मिळून १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी आलेल्या उमेदवारी अर्जांची छाननी आज होतआहे. छाननी झाल्यावर वैध उमेदवारांची यादी जाहीर होईल. उद्या आणि परवा तसंच येत्या मंगळवारी म्हणजे २३, २४ आणि २७ तारखेला दुपारी ११ ते ३ या वेळात उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. उमेदवारांची अंतिम यादी आणि चिन्ह वाटप २७ जानेवारीला दुपारी साडेतीननंतर प्रसिद्ध होईल.  येत्या ५ फेब्रुवारीला मतदान तर मतमोजणी ७ फेब्रुवारीला होईल.

<><><><><>

बुलढाणा जिल्ह्यात पाच नवीन ग्रामपंचायतींची स्थापना करण्यात आली असून, आता जिल्ह्यातल्या ग्रामपंचायतींची संख्या ८७५ झाली आहे. शासन राजपत्रात यासंदर्भातली अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेअंतर्गत चिखली तालुक्यातल्या ग्रामपंचायत अंचरवाडीचे विभाजन करून वसंतनगर, आणि मेहकर तालुक्यातल्या ग्रामपंचायत विश्विचं विभाजन करून राजगड इथं नवीन ग्रामपंचायती स्थापन करण्यात आल्या आहेत. तर सर्वसाधारण निकषांअंतर्गत लोणार तालुक्यातल्या पारडाचं विभाजन करून धायफळ, जळगाव जामोद तालुक्यातल्या रसूलपूरचं विभाजन करून वायाळ, तसंच सुनगावचं विभाजन करून चालठाणा खुर्द इथं नवीन ग्रामपंचायती स्थापन करण्यात आल्या आहेत.

<><><><><>

नांदेड–वाघाळा शहर महानगरपालिकेतल्या भारतीय जनता पक्षाच्या नवनिर्वाचित नगरसेवकांची बैठक आज पार पडली. या बैठकीत महेश कनकदंडे यांची भाजपच्या मनपा गटनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली. यावेळी खासदार डॉ.अजित गोपछडे, भाजपचे मराठवाडा विभागीय संघटक संजय कौडगे, नांदेड महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर उपस्थित होते.

<><><><><>

हवामान बदलाच्या या युगात हवामानाशी संबंधित अचूक तपशील मिळवण्याची गरज असून त्यादृष्टीनं सुयोग्य अशी अत्याधुनिक उपकरणं वापरली जावीत, असं जल शक्ती मंत्रालयाचे सचिव व्ही एल कांता राव यांनी आज सांगितलं. पुणे इथे प्रिसि - सेन्स २०२६ या राष्ट्रीय कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. अशा प्रकारची मोजमाप करणारी जागतिक दर्जाची उपकरणं देशात तयार होण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

<><><><><>

महाराष्ट्र सरकारच्या वतीनं मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने रायगड जिल्ह्यातल्या पेण तालुक्यात विकास केंद्र उभारण्यासाठी काल दावोस इथं विविध जागतिक कंपन्यांसमवेत सामंजस्य करार केले. तिसरी मुंबई म्हणून संकल्पित असलेला हा प्रकल्प, तंत्रज्ञान, अर्थतंत्र आणि डेटा सेंटरसाठी अत्याधुनिक केंद्र म्हणून उदयास येणार आहे. रायगड जिल्हा हा भारताचा पहिला समर्पित जागतिक क्षमता केंद्र म्हणून ओळखला जाणार आहे. जागतिक कंपन्यांनी या विकास केंद्राला गुंतवणूक आणि प्रमुख व्यवसाय म्हणून विचारात घेण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं.

मुंबई विमानतळाजवळ अत्याधुनिक नवोन्मेष शहर म्हणजेच इनोव्हेशन सिटी विकसित करण्याची घोषणाही यावेळी फडणवीस यांनी केली. या प्रकल्पासाठी टाटा समूह ११ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार आहे. स्टार्टअप समुदायाला पाठिंबा देण्यासाठी विशेष तयार करण्यात आलेली प्लग अँड प्ले ही परिसंस्था उपलब्ध करून देणे हा या प्रकल्पाचा उद्देश असल्याचेही फडणवीस यांनी सांगितलं.

<><><><><>

गेल्या दशकभरात भारत एक जागतिक आर्थिक शक्ती म्हणून उदयाला आला आहे, असं नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी सांगितलं. ते दावोस इथं जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीत आयोजित सत्रात काल बोलत होते. भारत आता उदयोन्मुख अर्थव्यवस्था राहिला नसून जागतिक अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग बनला आहे, असं नायडू म्हणाले. भारताचा विकास व्यापक पायावर आधारित, डिजिटली सक्षम, पायाभूत सुविधांनी सुसज्ज आणि सर्वसमावेशक आहे, डिजिटल पायाभूत सुविधांचा विकास हा भारतीय अर्थव्यवस्थेतला महत्त्वाचा बदल आहे, असं नायडू यांनी नमूद केलं.

केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी या परिषदेत बोलताना जागतिक गुंतवणूकदारांना स्वच्छ ऊर्जा वापराच्या प्रसारासाठी भारतासोबत भागीदारी करण्याचं आवाहन केलं.

<><><><><>

बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानाला ११ वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमांवर विशेष संदेश लिहिला आहे. देशाच्या लेकी वेगवेगळ्या आघाड्यांवर प्रगतीचे नवे उच्चांक प्रस्थापित करत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

<><><><><>

नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनाच्या परिसरातलं ऐतिहासिक अमृत उद्यान येत्या ३ फेब्रुवारीपासून सर्वसामान्य जनतेला पाहण्यासाठी खुलं करण्यात येणार आहे. ३१ मार्चपर्यंत हे उद्यान सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत खुलं राहिल. हे उद्यान ४ मार्च रोजी होणाऱ्या होळीनिमित्त बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीनं दिली आहे.

<><><><><>

पी व्ही सिंधू आणि लक्ष्य सेन या दोघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करत इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. लक्ष्य सेननं पुरुष एकेरी गटात हाँगकाँग चीनच्या जेसन गुनावान याला २१-१०, २१-११ असं नमवलं तर महिला एकेरीमध्ये दोन वेळच्या ऑलिम्पिक पदकविजेत्या सिंधूनं डेन्मार्कच्या होजमार्क कजेरफेल्ड्ट चा २१-१९, २१-१८ असा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीत सिंधूचा मुकाबला आता चीनची चेन यू फेई हिच्याशी होणार आहे.

<><><><><>

जागतिक कीर्तीचे ख्यातनाम ढोलकीवादक राजारामभाऊ जामसंडेकर यांचं आज पहाटे मुंबईत निधन झालं. ते ७४ वर्षांचे होते. उस्ताद झाकिर हुसेन, पंडित भवानी शंकर यांसारख्या कलाकारांसोबत जुगलबंदी वादन करणाऱ्या राजाभाऊंनी हिंदी-मराठी सिनेसृष्टीतल्या अनेक संगीतकारांसोबतही काम केलं.

लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या लोकसंगीताच्या कार्यक्रमात ते प्रदीर्घकाळ ढोलकीवादक म्हणून जोडलेले होते.

**<><><><><>**

रणजी क्रिकेट स्पर्धेचा दुसरा टप्पा आज हैद्राबादच्या राजीव गांधी मैदानात आज सुरु झाला. मुंबई विरुद्ध हैद्राबाद असा हा सामना असून, हैद्राबादनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना उपाहारापर्यंत मुंबईच्या २ बाद ७९ धावा झाल्या आहेत. मुशीर खान ९ तर कर्णधार सिद्धेश लाड ७ धावांवर खेळत आहे.

**//<><><><><>//**